जा.क्र.2022/मशाका/जिआव्य.निकक्ष/कावि-
जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद
दिनांक 07/07/2022

## निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात 11 महिन्याच्या कालावधीकरीता "जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी" हे पद भरण्यासाठी जाहिरात

जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद यांचे कार्यालयासाठी " **जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी** " हे पद निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात 11 महिन्याच्या कालावधीकरीता भरण्याकरिता **दिनांक 18/07/2022** रोजी सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

1. पदाचे नाव : जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी
2. पदसंख्या : एक
3. काल मर्यादा : निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात, 11 महिन्याच्या कालावधीसाठी. (परिस्थीती नुसार 11 महिन्यानंतर मुदतवाढी बाबत निर्णय घेण्यात येईल.)
4. ठोक वेतन : 45,000/- प्रती महिना (या व्यतिरिक्त कोणतेही भत्ते देय राहणार नाहीत)
5. शैक्षणिक अर्हता : मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी / पदव्युतर पदवी (सामाजिक शास्त्रे किंवा आपत्ती व्यवस्थापन)
6. अनुभव : 1) 3 वर्षाचा अनुभव त्यातील किमान 2 वर्ष आपत्ती व्यवस्थापनातील अनुभव असावा
   2) मराठी व इंग्रजी भाषाचे चांगले ज्ञान असणे इष्ट.
   3) टिपणी लेखन, अहवाल लेखन यामध्ये विशेष प्राविण्य
   4) शासकीय कामाच्या अनुभवास विशेष प्राधान्य देण्यात येईल
   5) वरील बाबीचा पुर्तता होत असल्यास व प्रकल्प हाताळण्याचा पुर्वानुभव असल्यास अशा उमेदवाराचा सदर पदासाठी विचार केला जाईल.
7. अर्जदाराने अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या शासकीय स्व साक्षांकित केलेल्या प्रती जोडणे बंधणकारक आहे.

अ. किमान शैक्षणिक अर्हता व त्यावरील शैक्षणिक अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे गुणपत्रक व प्रमाणपत्र
ब. शाळा सोडल्याचा दाखला / जन्म दाखला
क. 3 वर्षाचा अनुभव त्यातील किमान 2 वर्ष अनुभव आपत्ती व्यवस्थापनातील असल्याबाबत प्रमाणपत्र.
ड. शासकीय कामाचा अनुभव असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र.
इ. प्रकल्प हाताळण्याचा पुर्वानुभव असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र.
ई. महाराष्ट्रातील रहिवाशी प्रमाणपत्र.
फ. लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे.

**8. निवड करण्याची पद्धत**

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या पदाची निवडपद्धती पुढील प्रमाणे राहील.

1. लेखी परिक्षा - 80 गुण
2. परिक्षेचा दर्जा - पदवी

3. पात्रता - किमान 40 गुण
4. पात्रतेनंतर मुलाखतीद्वारे निवड

**लेखी परिक्षा दिनांक - दिनांक 27.07.2022 रोजी सकाळी 11.00 वा.**

**परिक्षेचे ठिकाण - जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.**

**9. पात्रतेच्या अटी व शर्ती :-**

1. इच्छूक उमेदवारांनी भरती प्रक्रियेसाठी जाहिराती मध्ये दिलेले दिनांक व वेळेनुसार उपस्थित रहावे. पोस्टामार्फत पत्र पाठविण्यात येणार नाही. आवश्यकता भासल्यास मेल व्दारे कळविण्यात येईल. भरती प्रक्रियेसाठी पात्र उमेदवारांची यादी जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद यांच्या नोटीस बोर्ड व वेबसाईट aurangabad.gov.in वर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच निवडलेल्या उमेदवारांची नियुक्ती आदेशाची प्रत नोटीस बोर्डावर तसेच उपरोक्त वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.
2. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार केला जाणार नाही.
3. उमेदवाराने त्याच्या उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.
4. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे नंतर निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.
5. अंतिम निवड झालेल्या उमेदवाराची निवड कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांचे राहतील. तसेच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती देणे जिल्हाधिकारी यांचेवर बंधनकारक राहणार नाही.
6. अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने दिनांक 01.08.2022 रोजी नियुक्तीच्या ठिकाणी स्वखर्चाने रुजु होणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यांची नियुक्ती आपोआप रद्द होईल व ते पुढील नियुक्तीस अपात्र ठरतील. तसेच निवड सुचीतील प्रतिक्षायादीनुसार पुढील पात्र उमेदवारास नियुक्ती दिली जाईल.
7. मुळ प्रमाणपत्रांची खातरजमा केल्यानंतरच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी रुजु करुन घेण्यात येईल.
8. उमेदवारास नियुक्ती दिल्यानंतर चारित्र्य पडताळणी अहवाल असमाधानकारक असल्यास नियुक्ती रद्द करण्यात येईल.

**10. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांचे कर्तव्ये व जबाबदा-या.**

1. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे व त्याचे अद्यावतीकरण, विचार विनियम कार्यशाळा आयोजित करणे, आराखड्याची व्यवहार्यता तपासणे, रंगीत तालमी घेणे, आपत्ती व्यवस्थापनासंबंधी विभागाचे आराखडे तयार करणे.
2. नैसर्गिक अथवा मानवनिर्मित आपत्ती येण्यापूर्वी, आपत्ती सुरु असतांना व आपत्तीनंतर करावयाच्या उपाययोजना बाबत सनियंत्रण करणे.
3. संस्थात्मक मजबुतीकरण - जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मजबुतीकरण, आपत्ती व्यवस्थापनाशी निगडीत संस्थांचे प्रशिक्षण, सामाजिक कार्य महाविद्यालय, इस्पितळांची सज्जता, जिल्हा आपतकालीन कार्यकेंद्राची सज्जता.

4. प्रशिक्षण व सक्षमीकरण - प्रशासन, अभियंते, वास्तुविशारद, डॉक्टर्स, पॅरामेडीकल्स, गवंडी, विद्यार्थी व शिक्षक, प्रसारमाध्यमे, उद्योग जगत यांचे प्रशिक्षण व सक्षमीकरण.
5. जनजागृती कार्यक्रम - रोड शो, लोकगीते, पोवाडे, पथनाटय, भिंतीचित्रे, जाहिरात फलक, पोस्टर स्पर्धा, निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, अभ्यासक्रमा व्यतिरिक्त स्पर्धांचे आयोजन, रेडीओ जिंगल्स इ.मधुन जनजागृती करणे.
6. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधिल तरतुदीनुसार जिल्हा प्राधिकरण, अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांचे तोंडी व लेखी आदेशानुसार कामकाज करणे.

**11. विशेष सुचना :-**

1. उमेदवाराने आपला सोबतच्या नमुन्यातील अर्ज ए-4 साईजच्या पांढऱ्या कागदावर टंकलिखित हस्तलिखित करुन मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, प्रशासकीय इमारत, फाजलपूरा, औरंगाबाद या पत्यावर **जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासून दिनांक 18/07/2022 रोजी 05.00 वाजेपर्यंत पोहोचेल अशा रितीने पोस्टाव्दारे किंवा आवक जावक शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद येथे समक्ष सादर करावेत.** या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस वगळून) प्राप्त झालेल्या विहित नमुन्यातील अर्जाचा विचार करण्यात येईल. अर्जाच्या पाकिटावर ठळक अक्षरात पदाचा उल्लेख करावा. जाहिरात व अर्जाचा नमुना या कार्यालयाचे वेबसाईट aurangabad.gov.in वर उपलब्ध आहे.
2. जाहिरातीपुर्वी व जाहिरातीमध्ये दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त तसेच अपुर्ण, अर्धवटरीत्या भरलेले, चुकीचे भरलेले अर्ज वा काही त्रुटी आढळून आल्यास अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
3. अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.
4. भरती प्रक्रिये संदर्भात न्यायालयीन दाव्याचे कार्यक्षेत्र औरंगाबाद राहील.
5. परिक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी **दिनांक 27.07.2022 रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाचे नोटीस बोर्डावर लावण्यात येईल.** त्याच प्रमाणे या कार्यालयाचे वेबसाईट aurangabad.gov.in वर प्रसिद्ध करण्यात येईल. **पात्र उमेदवारांची मुलाखत दिनांक 27/07/2022 रोजी 17.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद येथे घेण्यात येईल.**
6. निवड झालेल्या उमेदवाराने दिनांक 01.08.2022 रोजी कामावर रुजु होणे बंधनकारक राहील तसेच विहित नमुन्यातील करारनामा नियुक्तीनंतर सात दिवसाचे आत रु.100/- चे बॉन्डवर करुन देणे बंधनकारक राहील.
7. एक अथवा सर्व अर्ज नाकारण्याचा, निवड प्रक्रियेत वेळेवर होणारा बदल तसेच अंतिम निर्णय इत्यादी बाबतचे संपुर्ण अधिकार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती यांनी राखुन ठेवला आहे.

सुनील चव्हाण भाप्रसे
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा निवड समिती, औरंगाबाद

# <u>जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पदासाठी</u>
## अर्जाचा नमुना

प्रति,

मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा निवड समिती, औरंगाबाद
जिल्हाधिकारी कार्यालय, प्रशासकीय इमारत,
फाजलपूरा, औरंगाबाद 431 001

| पासपोर्ट साईज फोटो (साक्षांकित) |
|---|

पदाचे नाव : **"जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी"**
**(निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात 11 महिन्याच्या कालावधीकरीता)**

जाहिरात क्रमांक : -----------------------

1. संपुर्ण नाव (मराठीत) ------------------------------------------------------------------
आडनाव स्वत:चे नाव वडील/पतीचे नाव

**2.** पत्र व्यवहाराचा पत्ता ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

**3.** दुरध्वनी व मोबाईल क्र-----------------------------------------------------------

4. लिंग : ( पुरुष ) / ( स्त्री )

5. अर्जदाराची जन्म तारीख (शालांत प्रमाणपत्रानुसार) ----------------------------------------

6. दिनांक /12/2022 रोजी होणारे पुर्ण वय -----------------------------------------

7. वैवाहिक स्थिती :- **(विवाहित) / ( अविवाहित)**

8. महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय ? ---------------------------------------------

9. शैक्षणिक अर्हता अनुभव :-

| अ क्र | मंडळ/विद्यापीठाचे नाव | परीक्षेचे नाव | उत्तीर्ण वर्ष | विषय | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | |
| 2 | | | | | |
| 3 | | | | | |
| 4 | | | | | |
| 5 | | | | | |
| 6 | | | | | |
| 7 | | | | | |
| | **एकुण** | | | | |

शैक्षणिक अर्हता बाबतचे प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे.

6. पूर्वानुभव (शासकीय / खाजगी) :-

| कार्यालयाचे नाव व पत्ता | धारण केलेले पदनाम | नोकरीचा कालावाधी |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

पूर्वानुभव असल्यास संबंधित कार्यालयाचे/संस्थेचे दाखला/ प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

10 अ. आपत्ती व्यवस्थापनातील अनुभव :-

| कार्यालयाचे नाव व पत्ता | धारण केलेले पदनाम | नोकरीचा कालावाधी |
|---|---|---|
| | | |
| | | |

संबंधित कार्यालयाचे/संस्थेचे दाखला/ प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

11. संगणक अर्हता :-----------------------------------------------------------------------

दिनांक

स्थळ

अर्जदाराचे नांव व स्वाक्षरी

प्रमाणपत्र

जाहीरातीसोबत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

अर्जदार

## लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र :-

मी श्री / श्रीमती / कुमारी -------------------------------------------------------------------------------
वय वर्ष राहणार ---------------------------------------------------------------------------------
या व्दारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो / करते की, मी ______________________________
या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे. आज रोजी मला ------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक 28 मार्च, 2005 यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ----------- आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा)

1) 2)

हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च 2005 व तदनंतर जन्मला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र होउ शकतो मला जाणीव आहे.

पात्रतेच्या अटी व शर्ती मला मान्य असून या अटी व शर्तीचा भंग केल्यास भरतीच्या कुठल्याही टप्प्यामध्ये माझी उमेदवारी रद्द होईल याची मला जाणीव आहे. अर्जात नमुद केलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता आणि अनुभव माझ्याकडे आहे. मी असे प्रमाणित करतो /करते की, वर दिलेली माहिती खोटी व चुकीची आढळून आल्यास खोटया माहितीच्या आधारे मिळालेली उमेदवारी किंवा निवड/नियुक्ती रद्द होण्यास बाध्य राहिल. त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**दिनांक : /07/2022**

**ठिकाण :**

**अर्जदाराचे नाव व सही**

खालील कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रती जोडली आहे [ ✓ ] मध्ये अशी खुण करावी.

1. शाळा सोडल्याचा दाखला [ ]
2. शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र व गुणपत्रिका [ ]
3. संगणक परिक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणात्र [ ]
4. पुर्वानुभवाचा दाखला / प्रमाणपत्र (किमान 3 वर्ष) [ ]
5. आपत्ती व्यवस्थापनातील अनुभवाचा दाखला (किमान 2 वर्ष ) [ ]

**दिनांक : /07/2022** **अर्जदाराचे नाव व सही**

टिप - या कार्यालयाने " दैनिक लोकमत " मध्ये दिनांक 15.12.2021 रोजी दिलेल्या जाहिरातीचे अनुषंगाने " जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी " या पदासाठी दिनांक 22.12.2021 पर्यंत प्राप्त झालेले सर्व अर्ज रद्द करण्यात येत आहे.

तसेच दिनांक 08.07.2022 रोजी " दैनिक लोकमत " मध्ये दिलेल्या जाहिरातीनुसार दिनांक 18.07.2022 पर्यंत " जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी " या पदासाठी नव्याने अर्ज मागविण्यात येत आहे.

Scanned with CamScanner